# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–२८/०७/२०१६.

**१) संगनमत करुन शिविगाळ व मारहान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०७/२०१६ चे ०१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती बहीणबाई बळीराम आसवले वय ६६ वर्ष, रा. मालीपार ही घरी खाटेवर झोपली असता यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन तिच्या घरी जावुन ''तुझ्या घरच्या शेतकुळया काळया आम्ही चोरुन नेल्या काय'' असे बोलुन भांडण केले. व तिला खाटेवरुन ओढत बाहेर नेवुन शिविगाळ करुन आरोपी क्र. १ ने लाकडी पाटीने डावे डोळयाच्या बाजुला मारुन व आरोपी क्र. २ ने चप्पल ने मारपीट करुन जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उके पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) विवाहीतेवर जबरीने अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/११/२०१५ रोजी ०८.०० पासुन ते सायंकाळ पर्यन्त.फिर्यादी ही दि ०८/११/२०१५ला आपल्या वाहणातुन नागपुर वरुन राजनंदगाव येथे जात असता सायंकाळी तीची प्रकृती भंडारा येथे खराब झाल्याने तिने अशोका लॉज येथे खोली घेवुन विश्रांती घेतली. असता दुस–या दिवशी दि. ०९/११/२०१५ ला सकाळी यातील आरोपी क्र.१व२त्या ठिकाणी आले व खोली मधील असणा–या सर्वाना मारहाण करुन हाकलुन दिले व आरोपी क्र. २ याचे कडुन आरोपी क्र.१ ने त्याचे गाडीतुन पिस्तुल मागवुन फिर्यादीला धमकावले व आरोपी क्र. २ ला बाहेर जाण्यास सांगुन खोलीला आतुन कडी लावुन फिर्यादीला शिविगाळ करुन मारहाण केली. व मुलाला, पतीला जिवेमारण्याची धमकी देवुन पिस्तुल दाखवुन जबरदस्तीने तिच्याशी अत्याचार केला. व जबरदस्तीने स्वतःचे गाडी मध्ये बसवुन परत तिला नागपुर येथे रिसॉर्ट वर नेवुन परत अत्याचार केला. असे फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६६,३७६(न),३२३,५०४,५०६,३४१ भादंवि. सहकलम ३/२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चव्हाण पो.स्टे. भंडारा हे करीत आहे.

**३) मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक २७/०७/२०१६ रोजी १०.३० ते ११.०० वा. दरम्यान फिर्यादी शंकर मधुकर गावडे वय ४२ वर्ष, रा. म. रा. वि. वि. कंपनी पालांदुर लाईनमेन दहेगाव जि. नागपुर ह. मु. समर्थ नगर लाखनी हे म. रा. वि. वि. कं. पालांदुर अतर्गत गुरढा येथे जनमित्र लाईनमेन असुन ते बंद विद्युत लाईन दुरुस्ती करीता गेले असता आरोपीने फिर्यादी जवळ जावुन 'माझी लाईन बंद का आहे' असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी देवुन हातातील काठीने फिर्यादीचे उजवे पायावर हातावर मारहान करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन अपमान केले. असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३५३,३३२,५०४,५०६भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक २८/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०४ केसस, तिन सिटर वाहनांवरती १३ केसेस व इतर वाहनांवरती ९१ केसेस करण्यात आलेल्या आहे

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.